नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/06/2023 (शनिवार) दुपार

## घरफोडी गुन्हयातील आरोपीतांना केले जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

पो.स्टे. कुही येथे अप. क्र. ३३/२०२३ कलम ४५७, ३८० भा.द.वि. व पोस्टे उमरेड येथे अप. क्र. ३०६/२०२३ ४५७, ३८० भा.द.वी. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपासात मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने दिनांक १५/०६/२०२३ रोजी उमरेड उपविभागातील पोस्टे उमरेड अप. क्र. ३०६/२०२३ ४५७, ३८० भा.द.वी. व पोलीस स्टेशन कुही येथील अप. क्र. ३३/२०२३ कलम ४५७, ३८० भा.द.वी. बार मधील दुकानफोडी च्या गुन्ह्यात समांतर तपास करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी हे हिंगणा नागपूर शहर हद्दीत संशयीतरीत्या फिरत आहे. अशी गोपनीय माहिती मिळाल्याने हिंगणा नागपूर शहर परीसरात सापळा रचुन रेड केली असता **आरोपी नामे—१) अभिषेक अनिल नगराळे, वय २८ वर्ष रा. वार्ड क्र. २ वानाडोंगरी विजय नगर ता हिंगणा, जि. नागपूर २) राकेश दिलीप दास, वय ३१ वर्ष, रा. शिवाजी पार्क जवळ वार्ड क्र. १० फ्लॅट क्र. २९१ हिंगणा रोड नागपूर ३) अनुप सुधीर पाटील, वय ३० वर्ष, रा. शुभम नगर प्लॉट क्र. ४३ हिंगणा रोड नागपूर ४) संदीप विठ्ठलराव इंगळे वय ४२ वर्ष रा. हुडकेश्वर पोलिस स्टेशनच्या मागे प्लॉट १४७ नागपूर** यांना ताब्यात घेऊन बारचे झालेल्या दुकानफोडी बाबत सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, बारचे दुकानफोडी करून चोरी केल्याचे सांगितले. सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन आरोपीतांकडुन १) LG कंपनी चा टीव्ही ३००००/—रू २) मोबाईल किंमती ३०००/— रू. ३) विदेशी दारू वेगवेगळया कंपनीची किंमती अंदाजे ४१९३०/— रू असा एकूण ७४९३०/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून त्यांना पुढील योग्य कायदेशीर कारवाईस्तव पोलीस स्टेशन उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक अशिषसिंग ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार मिलिंद नांदुरकर, गजेंद्र चौधरी, अरविंद भगत, रोशन काळे, पोलीस नायक बालाजी साखरे, अमृत किंगे, रोहन डाखोरे, विपीन गायधने, सतिश राठोड (सायबर सेल) तसेच चालक पोलीस शिपाई आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.




## चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील पिपळा किनखेडे येथे दिनांक १३/०६/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक १४/०६/२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शुभम शंकरराव श्रीखंडे, वय २७ वर्ष रा. पिपळा किनखेडे ता. कळमेश्वर जि. नागपूर यांचे शेतातील विहीरीवर लावलेली ईलेक्ट्रीक मोटार व बाजुचे शेतातील सुध्दा ईलेक्ट्रीक मोटार दोन्ही मोटरची किंमती अंदाजे १२०००/—रू कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. यादव ब. नं. १६३९ मो. नं. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बस स्टॅड सावनेर येथे दिनांक १६/०६/२०२३ चे ०६.२३ वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. आशा नरेन्द्र धुर्वे, वय ४० वर्ष रा. खरसोली ता. नरखेड ही बसमध्ये बस स्टॉप सावनेर येथुन बसत असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने प्रवासाची गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीच्या बॅग मधुन लहान पर्स व त्यामध्ये असलेले ८ ग्रॅमची सोन्याची गरसोळी किंमती अंदाजे १२०००/— रूपयाची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राजेश हावरे, मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**